# डोंबिवली जवळील पलावा वसाहतीत निर्माणाधिन इमारतीला भीषण आग; आगीत १० माळे खाक, जीवित हानी नाही



**■डोंबिवली। प्रतिनिधी,**
येथील पलावा वसाहती मधील निमार्णाधिन असलेल्या एका १९ माळ्याच्या इमारतीला शनिवारी दुपारी अचानक आग लागली. बघता बघता आगीने रौद्र रूप धारण केले. आगीत इमारतीच्या पाचव्या माळ्यापासून ते गच्चीपर्यंतचे माळे जळून खाक झाले. आगीत जीवित हानी झाली नाही.

पलावा टप्पा दोन येथे टाटा ओरोलिया इमारतीच्या यांत्रिक सामान असलेल्या तळगृहात (डक्ट) अचानक आग लागली. वाऱ्याच्या वेगाने आगीने रौद्ररूप धारण करून आग यांत्रिकी जाळे असलेल्या दिशेने वरच्या माळ्यांपर्यंत पसरत गेली. पलावा वसाहतीमधील दोन अग्निशमन वाहने तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी तातडीने आगीवर पाण्याचे फवारे मारून आग विझविण्यास सुरूवात केली. ही वाहने सात ते आठ माळ्यापर्यंतची आग विझू शकले. त्यानंतर पयार्यी यंत्रणेचा वापर करून जवानांनी इमारतीच्या वरच्या भागापर्यंत गेलेली आग एक तासाच्या अथक प्रयत्नाने विझवली. आग लागल्यानंतर खोणी पलावा वसाहती मधील इतर रहिवाशांमध्ये भितीचे वातावरण पसरले होते.

पलावा वसाहतीत आग लागली तर टोलेजंग इमारतींच्या मजल्यांवरील आग विझविताना अग्निशमन जवानांना तेवढ्या उंचीची यंत्रणा उपलब्ध नसल्याने अग्निशमन जवानांना पयार्यी यंत्रणेचा वापर करून आग विझवावी लागते, असे रहिवाशांनी सांगितले. तर पलावा अग्निशमन केंद्रातील जवानांनी आग विझविताना सर्व साधनांचा वापर करून आग विझवली आहे. आगीत कोणतीही जीवित हानी झालेली नाही, असे सांगितले.

आग लागल्यानंतर काटई-बदलापूर छेद रस्त्यावरील खोणी-तळोजा रस्त्यावरील वाहन चालक, प्रवासी आगीचे रौद्ररूप पाहण्यासाठी रस्त्याच्या कडेला वाहने घेऊन थांबले होते. दूर अंतरावरून ही आग दिसत होती. शहराच्या एका बाजुला आग लागलेली इमारत असल्याने वाऱ्याच्या वेगाने इमारतीमधील आगीने वेगाने पेट घेतला. तळगृहातील यांत्रिकी यंत्रणेत बिघाड झाल्यानेच आग लागण्याची प्राथमिक शक्यता जवानांनी व्यक्त केली.

# नवी मुंबईतील विकासकाची कार्यालयात घुसून हत्या





**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**
आज सकाळी नवी मुंबईतील करावे गावात एका विकासाकाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. आज सकाळी साडे दहा अकराच्या सुमारास जेव्हा विकासाकाकडे काम करणारे कर्मचारी कार्यालयात आले त्यावेळी हा प्रकार उजेडात आला. याबाबत हत्येचा गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

नवी मुंबईत फेब्रुवारी २०१३ मध्ये वाशीतील एस. के.बिल्डरचे सुनील लाहोरीया यांची कार्यालयात प्रवेश करताना काही लोकांनी हल्ला करीत गोळ्या झाडून हत्या केली होती. या घटनेची आठवण करून देणारी घटना आज (शनिवारी) नवी मुंबईतील सीवूड्स सेक्टर ४४ (करावे गाव) येथे घडली आहे. या ठिकाणी अमन डेव्हलपर्स नावाचे कार्यालय असून सदर कार्यालय मनोज सिंग यांचे आहे. मनोज हे बांधकाम व्यवसायात आहेत. आज सकाळी साडे दहा अकराच्या सुमारास कार्यालयातील काही कर्मचारी कार्यालयात दाखल झाले असता. त्यांना मनोज सिंग यांचा मृतदेह आढळून आला.


याबाबत पोलिसांना माहिती मिळताच सहाय्यक आयुक्त राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल सह पथक दाखल झाले. मनोज सिंग यांच्या डोक्यात गोळी लागली आहे. मात्र त्यांनी स्वतः गोळी झाडली या बाबत सुरवातीला संभ्रम निर्माण झाला होता. मात्र पूर्ण कार्यालयाची तपासणी केली असता कुठेही मर्डर वेपन अर्थात ज्या बंदुकीने गोळी झाडली ती बंदूक आढळून आली नाही. तसेच पोलिसांच्या हाती काही धागेदोरे आढळून आले. त्यामुळे ही हत्या असल्याचे समोर आले आहे. अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. याबाबत आमचा तपास सुरू आहे अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# स्वच्छ सर्वेक्षण-2023 मध्ये देशात ठाण्याची उल्लेखनीय कामगिरी



**■ठाणे। प्रतिनिधी,**
ठाणे महापालिका क्षेत्रात स्वच्छतेला दिलेले सर्वोच्च प्राधान्य, शहराची एकूण स्वच्छता आणि शौचालयांची स्वच्छता हे उद्दिष्ट ठेवून प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नांची परिणिती म्हणून स्वच्छ सर्वेक्षण -२०२३ मध्ये ठाणे शहराने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. २०२२मध्ये सहभागी सर्व शहरांत गुणानुक्रमानुसार ठाणे शहराचा ४४ वा क्रमांक आला होता. त्यावरून झेप घेत यंदा ठाणे शहराने २४ वे स्थान पटकावले आहे. महानगरपालिकेने वर्षभर स्वच्छतेसाठी निरनिराळे उपक्रम हाती घेतले. दररोज कचरा टाकला जिथे कचरा टाकला जात असे अशा १५०हून अधिक जागांवरील कचरा टाकणे पूर्णपणे थांबविण्यात आले. तसेच, घरोघरी कचरा संकलन करण्याची क्षमता वाढवून प्रत्येक घरी कचरा संकलन गाडी गेलीच पाहिजे, या सूत्रानुसार कचऱ्याचे संकलन सुरू करण्यात आले. रस्ते सफाईच्या कामांना सकाळी सहा वाजता सुरुवात करून आठ वाजेपर्यंत मुख्य रस्त्यांची सफाई पूर्ण करणे, स्वच्छता कर्मचारी पूर्णवेश कर्तव्यावर हजर असणे, बाजारपेठा आणि दुकानांच्या परिसरात सायंकाळी आणि रात्री साफसफाई करणे, यांत्रिक सफाईला सुरुवात अशा सर्वांगीण प्रयत्नांचे फलस्वरुप म्हणून स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये ठाणे शहराची कामगिरी मोठ्या प्रमाणावर सुधारलेली दिसते आहे.

# दोन हजारांसाठी मुकादम अडकला ACBच्या जाळ्यात, उल्हासनगर महापालिका कर्मचाऱ्यांची लाचखोरी पुन्हा एकदा उघड




**■उल्हासनगर। प्रतिनिधी,**
दाटीवाटीचा भाग मोकळा आणि स्वच्छ करण्याची जबाबदारी असलेले प्रभाग मुकादम आर्थिक आमिषाला बळी पडत शहरात आणखी अनधिकृत फेरीवाल्यांना सामावून घेत असल्याचा प्रकार समोर येत आहे. त्यातूनच प्रभागात शोरमा या खाद्यपदार्थ विक्रेत्याच्या चार गाड्या सुरूठेवण्यासाठी तीन हजारांची लाच मागून त्यातील दोन हजारांची लाच स्वीकारताना प्रभाग क्रमांक चारचा प्रभारी मुकादम संजय पेडामकर यांना लाचलुचपत विभागाने रंगेहाथ अटक केली आहे.

व्यापारी शहर असलेल्या उल्हासनगर शहरात ६० टक्क्यांहून अधिकचा भाग हा दुकाने आणि बाजारपेठांचा आहे. त्यामुळे दररोज येथे शेकडो वाहने, हजारो ग्राहक तसेच व्यापारी येत असतात. त्यामुळे शहरातील बाजारपेठेतील बहुतांश रस्ते कोंडीत अडकतात. या रस्त्यांवर आणि विशेषतः बाजारपेठांमध्ये तितक्याच प्रमाणात खाद्यपदार्थ विक्रेते, लहान मोठ्या वस्तूंची विक्री करणारे हातगाडीवालेही असतात. यांच्यामुळे अनेकदा रस्त्यांचा मोठा भाग व्यापला जातो. या ठिकाणी आलेले ग्राहक, त्यांची वाहने यामुळे कोंडी आणि अस्वच्छताही वाढते. त्यातून मार्ग काढत सर्वसामान्य वाहने आणि पादचाऱ्यांना जावे लागते. हे फेरीवाले, हातगाड्यांवर कारवाई करण्यात उल्हासनगर महापालिका प्रशासन सातत्याने दुर्लक्ष करते. त्यामुळे पालिकेच्या आशीवार्दानेच या हातगाड्या सुरू असल्याचा आरोप केला जात असतो. मात्र नागरिकांच्या आरोपांना पुष्टी देणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ज्या प्रभाग समिती मुकादमावर अनधिकृत फेरीवाल्यांच्या वाहनांवर कारवाई करण्याची जबाबदारी आहे, त्याच मुकादमाने चार अनधिकृत खाद्यपदार्थांच्या गाड्या चालू देण्यासाठी लाच मागितली. उल्हासनगर महापालिकेच्या प्रभाग क्रमांक चारचे प्रभारी मुकादम संजय धाकू पेडामकर यांना दोन हजार रुपयांची लाच घेताना एसीबीने रंगेहात पकडले आहे. उल्हासनगर कॅम्प पाच परिसरात अनधिकृत शोरमा विक्रीच्या चार गाड्या उभ्या करण्याकरिता तीन हजार रुपयांची लाचेची मागणी करून सुरुवातीला ५०० रुपये तर २ हजार ५०० रुपये १० जानेवारीला घेण्याचे ठरले होते. या प्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला हा प्रकार कळवला.

# सायबर पोलीस ठाण्याने दोघा नागरिकांचे मिळवून दिले ५ लाख



**■मीरारोड। प्रतिनिधी,**
सायबर लुटारूंनी ऑनलाईन फसवणूक करून लुटलेले दोघा नागरिकांचे ५ लाख १ हजार ५८४ रुपये मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या सायबर पोलिसांनी परत मिळवून दिले आहेत. काशीमीरा पोलीस ठाणे हद्दीत राहणारे राहुल देतराज यांच्या क्रेडिट कार्ड वरून ३ व्यवहार करत सायबर लुटारूंनी ५६ हजार ४७२ रुपयांची फसवणूक केली होती. त्याबद्दल राहुल यांनी गेल्या वर्षी नोव्हेंबर मध्ये सायबर पोलिसांना तक्रार अर्ज दिला होता. सायबर पोलिसांनी व्यवहाराची माहिती घेतली असता क्रेडिट कार्डचे तिन्ही व्यवहार हे परदेशात केले गेले होते. आरबीएल बँके कडे फसवणुकीच्या रक्कम बाबत पत्र व्यवहार केले. दोन महिने पाठपुरावा केल्या नंतर फसवणुकीची संपूर्ण रक्कम राहुल यांच्या खात्यात वळती करण्यात पोलिसांना यश आले. दुसरा गुन्हा विरार पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या हेतल पटेल यांच्या बाबतीत घडला होता. सायबर लुटारूंनी ऑनलाईन व्यवहारात त्यांची ४ लाख ४५ हजार ११२ रुपयांची फसवणूक केली होती. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात पटेल यांचा तक्रार अर्ज सायबर पोलिसांना मिळाला होता.

# राम मंदीर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर मंदीर स्वच्छ अभियान; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा



**■ठाणे। प्रतिनिधी,**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार राम मंदीरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यभर मंदीर स्वच्छ करण्याचे अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केली. तसेच पंतप्रधान मोदी यांच्या पाऊलावर पाऊल ठेवत मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वतः प्राचीन कौपीनेश्वर मंदीराची स्वच्छता करून या अभियानाला सुरूवात केली. सर्वंकष स्वच्छता अभियानांतर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी ठाणे येथील प्राचीन कौपिनेश्वर मंदिर स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेतला. अयोध्येतील राम मंदीरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्व नागरिकांनी सर्व तीर्थ क्षेत्रे, मंदीरांमध्ये २२ जानेवारीपर्यंत स्वच्छता मोहिम राबवून श्रमदान करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्यानुसार राज्यभर मंदीर स्वच्छ करण्याचे अभियान राबविण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केली. ठाणे शहरातील मंदिरे स्वच्छ करण्याबरोबरच त्याठिकाणी रोषणाई करण्याच्या सुचना पालिका आयुक्तांना दिल्या असून राज्यभरातही मंदीर स्वच्छतेवर राज्य सरकार लक्ष केंद्रीत करणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात स्वच्छता भारत अभियान राबविले. याच प्रेरणेतून राज्यात सर्वकष स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. स्वच्छ भारत अभियानाप्रमाणेच सर्वंकष स्वच्छता अभियानानाला नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. या अभियानामुळे मुंबई आणि ठाणे परिसरातील प्रदुषणात मोठी घट झाली आहे, असा दावा त्यांनी केला. सर्वकष स्वच्छता अभियान ही एक लोकचळवळ निर्माण करायची आहे. या चळवळीच्या माध्यमातून राज्य स्वच्छ, सुंदर, हिरवेगार आणि निरोगी करण्याचे आहे, असेही ते म्हणाले.

# 'मराठी माणसाने उद्योजक बनण्याची मानसिकता ठेवावी', केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे आवाहन



**■वसई। प्रतिनिधी,**
मराठी माणसाने उद्योजक बनण्याची मानसिकता ठेवावी, त्यासाठी लागणारे सर्व सहकार्य करायला मी तयार आहे, असे आवाहन केंद्रीय उद्योग मंत्री नारायण राणे यांनी केले. विरार येथे आयोजित १९ व्या जागतिक मराठी संमेलनाचे उद्घाटन राणे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. जागतिक मराठी अकादमीतर्फे विरारमध्ये '१९ वे जागतिक मराठी संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. शनिवारी सकाळच्या पहिल्या सत्राचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते झाले. आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याशी मैत्री असल्याने संमेलनाला १० मिनिटे आधी आलो असे त्यांनी सांगितले. जागतिक मराठी परिषदेने मराठी माणसाच्या प्रगतीची दिशा ठरवावी, नियोजन करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जपान, अमेरिका ,चीन या देशांच्या तोडीने येण्यासाठी तंत्र आत्मसात करा आणि उद्योग उभारा, असे ते म्हणाले. प्रगतीचे मार्ग माझ्या हातात आहेत, मी तुम्हाला सर्व सहकार्य करायला तयार आहे, असेही ते म्हणाले. साहित्यिकांनी मनाला साहित्य देणारे साहित्य लिहावे, कुणाचं मन दुखावणारे साहित्य लिहू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

मी चित्रपट पहात नाही, भरपूर वाचन करतो

यावेळी राणे यांनी आपल्या साहित्याच्या आवडीबद्दल सांगितले. मी चित्रपट पहात नाही मात्र भरपूर वाचन करतो, असे ते म्हणाले. आमदार हितेंद्र ठाकूर यांचे विवा चॅरिटेबल ट्रस्ट तसेच साहित्य जल्लोष प्रतिष्ठानच्या सहविद्यमाने संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# नायलॉन मांजा वापरण्यास महापालिकेने केला प्रतिबंध



**■मीरारोड। प्रतिनिधी,**
मीरा भाईंदर महापालिकेने मकर संक्रांति निमित्त नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक व पतंग उडवण्याकरिता वापरण्यास प्रतिबंध घातला आहे. नायलॉन मांजाचा वापर केल्यास कारवाईचा इशारा पालिकेने दिला आहे. मकर संक्राती निमित्त पतंग उडवले जातात. पतंग उडवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक किंवा सिंथेटिक धाग्यांचा किंवा नायलॉन मांजा वापर करण्याची शक्यता असते. नायलॉन मांजामुळे पक्षी यांना इजा होते तसेच अनेक पक्षी जीव गमावतात. नायलॉन मांजामुळे केवळ पक्षीच नाही तर मनुष्य यांना सुद्धा धोकादायक असून नायलॉन मांजामुळे माणसांना देखील इजा होऊन अगदी जीव गमवावा लागल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळेच शासनाने देखील नायलॉन मांजा वर बंदी घातलेली आहे. शिवाय भारताच्या ऍनिमल वेल्फेअर बोर्डने सुद्धा याबाबत सूचना जारी केल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना पतंग उडवण्यासाठी नायलॉन मांजा ऐवजी पर्यावरण पूरक पयार्यांचा अवलंब करावा असे आवाहन महापालिकेने केले आहे . प्लास्टिक किया इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेल्या नायलॉन मांजाचा वापर टाळावा.

# भाजप, ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये घोषणाबाजी; दिघा गाव स्थानकाच्या लोकार्पणावेळी वाद



**■ठाणे। प्रतिनिधी,**
ठाणे आणि ऐरोली रेल्वे स्थानकादरम्यान असलेल्या दिघा गाव स्थानकाच्या लोकार्पण कार्यक्रमाच्या निमंत्रकपत्रिकेतून नाव वगळल्याने ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांनी कार्यकर्त्यांसह कार्यक्रमस्थळी जाऊन शक्तिप्रदर्शन केले. याठिकाणी भाजपचे कार्यकर्ते मोठया संख्येने जमलेले होते. दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने त्यांच्यात घोषणाबाजीबरोबरच ढोल-ताशांच्या वादनाची चढाओढ सुरू होती. यामुळे स्थानकात तणावाचे वातावरण होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी सायंकाळी दिघा गाव स्थानकाचे ऑनलाइन पद्धतीने लोकार्पण करण्यात आले. या लोकार्पण कार्यक्रमाच्या निमंत्रकपत्रिकेत ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांचे नाव वगळण्यात आले होते. याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

या स्थानकाचे लोकार्पण होणार असल्याने भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते शुक्रवार दुपारपासून स्थानकात ठाण मांडून बसले होते. माजी खासदार संजीव नाईकही त्या ठिकाणी होते. त्यानंतर अचानक दुपारी ३ वाजता खासदार राजन विचारे आणि त्यांचे कार्यकर्ते ढोल-ताशाचे वादन करत स्थानकात शिरले. या ठिकाणी एक मंच उभारण्यात आला होता.

# पालघर नगर परिषदेत करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी



**■पालघर। प्रतिनिधी,**
पालघर नगर परिषदेचा कार्यकाळ तीन महिन्यांत संपत असून नगर परिषदेच्या विद्यमान कौन्सिलने अखेरच्या टप्प्यात अनेक विकास योजनांमध्ये निधीची उधळपट्टी केल्याचे दिसून आले आहे. विकासाच्या नावाखाली पालघर नगर परिषदेत मोठ्या प्रमाणात अनियमित गैरप्रकार झाल्याचे आरोप असून नगर परिषदेने करदात्यांच्या पैशाने होऊन जाऊ दे खर्च अशी भूमिका घेतल्याचे दिसून आले आहे. पालघर नगर परिषदेने १३३९ झाडांची लागवड जुलै व ऑगस्ट २०२२ मध्ये केल्याचे दाखवून त्याचे बिल नोव्हेंबर २०२३ च्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आले. या झाडांच्या लागवडीसाठी १८ लाख ७६ हजार रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असून प्रत्येक झाडाच्या लागवडीसाठी सरासरी १४०० रुपये खर्च झाल्याचे दिसून आले. पावसाळ्यात तुंबणाऱ्या पाण्यामध्ये झाडे मरण्याचे प्रमाण अधिक असताना त्याच वेळेत झाडे का लावली गेली असा प्रश्न आहे. शिवाय अशा परिस्थितीत दीड फूट चौरस व दीड फूट खोलीचा खड्डा होण्यासाठी तब्बल १५० रुपयाचे दर निश्चित केल्याने प्रचलित मजुरी दरांपेक्षा अधिक मजुरी देण्यात आली आहे. त्याचबरोबर गोबर व लाल मातीची उपलब्धता पावसाळ्यात होत नसताना त्याद्वारे रोपट्यांची संगोपन केल्याचे भासवून पैशाची लूट झाली आहे.

खरेदी करण्यात आलेली रोप जरी दीड दोन वर्षपिक्षा मोठी असली तरी देखील आकारण्यात आलेली किंमत ही सर्वसामान्य नागरिकाला थक्क करणारी आहे. लावलेल्या रोपांभोवती प्लास्टिकची जाळी ही पाच ते सहा फूट उंचीची असल्याने लागवड करते वेळी हे रोप त्यापेक्षा कमी उंचीचे असल्याचे सिद्ध झाले आहे. एकंदरीत या प्रकारात देखील मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे स्पष्ट होत आहे. शहरामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी जानेवारी २०२२ मध्ये ८९ कॅमेरा बसवण्यासाठी ३५ लाख रुपयांची अंदाजीत किंमत असणारी निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. नोव्हेंबर २०२२ मध्ये ही निविदा मंजुरीसाठी ठेवताना बाजार भावापेक्षा अधिक असल्याचे नमूद करत फेरनिविदा काढण्याचा नगर परिषदेने निर्णय घेतला होता.

# दादोजी कोंडदेव प्रेक्षागृहाला नवी झळाळी; खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन



**■ठाणे। प्रतिनिधी,**
ठाण्याचे भूषण असलेल्या दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृहात खेळाडूंना अधिकाधिक सेवासुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी अनेक कामे हाती घेण्यात आली आहेत, याचाच एक म्हणून स्पोर्ट लायटिंग अंतर्गत आंतरराष्ट्रीय दजार्चे हायमास्ट बसविण्यात आले असून या हायमास्टचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी माजी नगरसेवक नजीब मुल्ला, विकास रेपाळे, उपयुक्त क्रिडाअधिकारी मीनल पालांडे, उपनगरअभियंता विद्युत शुभांगी केसवाणी आदी उपस्थित होते. दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृहात ठाणे व ठाण्यालगतच्या परिसरातील अनेक खेळाडू विविध खेळांसाठी येत असतात. या खेळाडूंना आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महापालिकेच्या माध्यमातून आवश्यक कामे सातत्याने केली जातात.

या ठिकाणी रात्रीच्या वेळेस पुरेसा प्रकाश मिळावा यासाठी नुकतेच स्पोर्ट लायटिंग अंतर्गत आंतरराष्ट्रीय दजार्चे हायमास्ट बसविण्यात आले असून या अंतर्गत एकूण ४ हायमास्टचा समावेश असून त्याची ६२ मीटर इतकी आहे.


# मुंबई महानगरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कोलमडली




**■ठाणे। प्रतिनिधी,**
नवी मुंबई येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी शुभारंभ करण्यात आलेल्या नमो महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या महिलांच्या वाहतुकीसाठी मुंबई महानगरातून ६२३ विशेष बस गाडयांची व्यवस्था करण्यात आली होती. यामुळे शहरांमध्ये बस गाडयांचा तुटवडा निर्माण झाल्याने बस थांब्यांवर लांब रांगा लागल्याने प्रवाशांचे हाल झाले. एकूण शहरांमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कोलमडून पडल्याचे चित्र दिसून आले.

नवी मुंबई येथे शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नमो महिला सशक्तीकरण अभियान आणि नारी शक्ती दूत ॲपचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमासाठी ठाणे, मुंबई, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आणि ग्रामीण भागातील महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या. त्यांच्या वाहतुकीसाठी मुंबई महानगरातून ६२३ विशेष बस गाडयांची व्यवस्था करण्यात आली होती. ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात ३३५ पैकी १२५ बस गाडया महिला वाहतुकीसाठी देण्यात आल्या होत्या. त्यातील ७५ बस गाडया ठाणे जिल्हा परिषदेने घेतलेल्या असून त्याचे पैसे ते देणार आहेत. उर्वरित ५० बस गाडया शहरातून सोडण्यात आल्या होत्या. तर २१० बस गाडयांची शहरात वाहतूक सुरू असल्याने प्रवाशांचे हाल झालेले नाहीत, अशी माहिती ठाणे परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे यांनी दिली. परंतु शहरात नेहमीपेक्षा कमी बस गाडया रस्त्यावर असल्यामुळे प्रवाशांचे हाल झाले.

# सोनसाखळी चोरीच्या कारवाईत सराईत चोरटे निघाले बाप-लेक; १४ गुन्ह्यांची दिली कबुली



**■ठाणे। प्रतिनिधी,**
असे म्हटले जाते बापाच्या पावलावर पाऊल टाकत मुलगा पुढे जातो. पण, ठाणे शहर पोलिसांनी केलेल्या सोनसाखळी चोरीच्या कारवाईत सराईत चोरटे हे बाप-लेक असल्याचे समोर आले आहे. अंबिवली येथे राहणाऱ्या असिफ शब्बीर सैय्यद (६२) बागर आसिफ सैय्यद (३८) या दोघांनी १४ गुन्ह्यांची कबुली दिली असून त्यामध्ये ५ लाख ४० हजार किंमतीचे १४१ ग्रॅम वजनाचे दागिने आणि दोन दुचाकी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वाढत्या सोनसाखळी गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी दिलेल्या निर्देशानुसार ठाणे गुन्हे शाखा युनिट-५ ने ही धडक कारवाई केली.

गुन्हे शाखा युनिट-५ च्या पोलीस पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांनी ठाण्यातील इंदिरानगर येथून अटक केली. त्या दोघांच्या अधिक चौकशीत त्यांच्यावर ठाणे परिसरात चितळसर, कापूरबावडी, ठाणे नगर, वागळे, श्रीनगर, आदी पोलीस ठाण्यात दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. १४ दाखल गुन्ह्यामध्ये १२ सोनसाखळी चोरीचे तर फसवणूक आणि वाहन चोरीचा प्रत्येकी एका एका गुन्ह्याचा समावेश आहे. सोनसाखळीचे प्रत्येकी तीन गुन्हे श्रीनगर आणि वागळे पोलीस ठाण्यात, ठाणे नगर आणि वर्तकनगर पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक- एक तर चितळसर पोलीस ठाण्यात ४ आणि कापूरबवाडीत २ गुन्हे याशिवाय श्रीनगर पोलीस ठाण्यात एक फसवणुकीचा तर वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात एक वाहन चोरीचा गुन्हा दाखल आहे.

